सुराज्य सोलापूर



# इराण-इस्रायलमधील १२ दिवसांचे युद्ध संपले

## डोनाल्ड ट्रम्प यांनी केली मोठी घोषणा

**वाशिंग्टन : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण-इस्रायलमधील युद्ध २४ तासांत संपेल, अशी घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. इराण आणि इस्रायल दोन्ही देश शस्त्रसंधीसाठी सहमत झाल्याचेही त्यांनी सांगिले. इस्रायलने पहिल्यांदा इराणवर हल्ला केला होता. इस्रायलने इराणच्या अणुऊर्जा केंद्रे आणि लष्करी तळावर हवाई हल्ले केले. त्याामुळे खवळलेल्या इराणने इस्रायलवर पलटवार केला. दोन्ही देशांतील संघर्ष विकोपाला गेला. त्यात अमेरिकेनेही इराणच्या तीन अणुऊर्जा केंद्रावर हवाई हल्ले केले. त्याानंतर आता अचानक डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविरामाची घोषणा केली आहे.**

## डोनाल्ड ट्रम्प काय म्हणाले?

"सर्वांचे अभिनंदन! पुढील १२ तासांत संपूर्ण युद्ध थांबवले जाईल, या मुद्द्यावर इराण आणि इस्रायलचे एकमत झाले आहे. (आतापासून जवळपास ६ तासांनंतर जेव्हा इस्रायल आणि इराण आपापली उद्दिष्टे पूर्ण करतील.) त्यानंतर युद्ध संपले आहे असे मानले जाईल", असे ट्रम्प यांनी म्हटले आहे.

"अधिकृतपणे इराण युद्धविरामाची सुरूवात करेल, तर १२ तासांनंतर इस्रायल. आणि २४ तासांनी १२ दिवसांचे युद्ध संपल्याबद्दल जगाकडून सलाम केला जाईल. या शस्त्रसंधीदरम्यान, दुसरा देश शांतता आणि सन्मान राखेल. या आधारावर की सर्व काही तसेच होईल, जसे व्हायला हवे. मी दोन्ही देशांना, इस्रायल आणि इराणचे अभिनंदन करतो की, त्यांच्याकडे १२ दिवसांचे युद्ध संपवण्यासाठी सहनशक्ती, धाडस आणि बुद्धिमत्ता आहे", असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे.

"हे एक असे युद्ध आहे, जे अनेक वर्षे चालले असते आणि पूर्ण मध्य पूर्व आशियाला नष्ट करू शकले असते. पण, असे झाले नाही आणि तसे कधीही होणार नाही. ईश्वराची कृपा इस्रायलवर राहो, ईश्वराची कृपा इराणवरही राहो. मध्य पूर्वला ईश्वराचा आशीर्वाद मिळो. ईश्वर अमेरिकेला आणि संपूर्ण जगाला आशीर्वाद देवो", असे म्हणत ट्रम्प यांनी इराण-इस्रायलमध्ये शस्त्रसंधी झाल्याची घोषणा केली आहे.





## शस्त्रसंधीचं १३ तासांत उल्लंघन, हल्ल्यानंतर ट्रम्प भडकले



**वॉशिंग्टन डीसी :** मध्य पूर्वेतील संघर्ष संपल्याचं जाहीर करत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा केली. पण त्यानंतर आता ट्रम्प यांनी काही तासांतच नाराजी व्यक्त केली आहे. 'इराण आणि इस्रायल या दोन्ही देशांनी शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं आहे,' असं ट्रम्प म्हणाले. त्यांनी विशेषत: इस्रायलचा निषेध केला. शस्त्रसंधी झाल्यानंतर इस्रायलनं इतका मोठा हल्ला करायला नको होता, असं म्हणत ट्रम्प संतापले.

इस्रायल, तुम्ही बॉम्बफेक करु नका. जर तुम्ही असं केलंत, तर ते शस्त्रसंधीचं उल्लंघन असेल. तुमच्या वैमानिकांना लगेच माघारी बोलवा, असं ट्रम्प कठोरपणे म्हणाले. इस्रायलनं शस्त्रसंधीची तयारी दर्शवत लगेच हल्ला केला. ही बाब मला आवडलेली नाही, असं ट्रम्प यांनी म्हटलं. इराणनं शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्याचा आरोप इस्रायलनं सर्वात आधी केला. पण इराणनं इस्रायलचे सगळे आरोप फेटाळून लावले. त्यानंतर ट्रम्प यांनी या सगळ्या घडामोडींवर भाष्य केलं आहे.

'इराण कधीही त्यांचा अण्वस्त्र कार्यक्रम पुन्हा सुरु करणार नाही. मी इराणवर खूश नाही आणि इस्रायलवर जास्त नाराज आहे,' असं ट्रम्प म्हणाले. ज्यावेळी बीयरशेवा शहरावर हल्ला झाला, त्यावेळी आम्ही अखेरचं क्षेपणास्त्र डागलं. तेव्हा शस्त्रसंधीची घोषणा झालेली नव्हती, असं इराणकडून सांगण्यात आलं आहे. आम्ही स्वसंरक्षणासाठी क्षेपणास्त्र डागलं. आमच्याकडून शस्त्रसंधीच्या कोणत्याही अटींचं उल्लंघन झालेलं नाही, असा दावा इराणनं केला.

इराण आणि इस्रायल यांच्यात १२ दिवसांपासून सुरु असलेला संघर्ष संपल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली होती. यासाठी ट्रम्प स्वत: इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि इराणी अधिकाऱ्यांशी बोलले. याचवेळी अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी कतारच्या पंतप्रधान कार्यालयाशी संपर्क साधला. इराण-इस्रायल संघर्ष थांबवण्यात कतारनं महत्त्वाची भूमिका बजावली.

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी कतारच्या आमीर यांच्यासोबत फोनवरुन संवाद साधला. इराणनं अमेरिकेचा प्रस्ताव मान्य करावा आणि शस्त्रसंधी स्वीकारावी, असं ट्रम्प यांनी आमीर यांना सांगितलं. यानंतर कतारच्या पंतप्रधानांनी इराणशी संवाद साधत शस्त्रसंधीचा प्रस्ताव स्वीकारण्याची विनंती केली.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतरही इस्रायलने केला इराणवर हल्ला

**नवी दिल्ली :** इराणची राजधानी तेहरानमध्ये मंगळवारी दोन मोठे स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. मिझान वृत्तसंस्था आणि शार्ग वृत्तपत्राने ही माहिती दिली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायललाइराणवर बॉम्ब हल्ला न करण्याचे आवाहन केल्यानंतर काही तासांतच हे स्फोट झाले आहेत. मंगळवारी जाहीर झालेल्या युद्धविरामानंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून हे आवाहन करण्यात आले होते. इराणच्या एतेमाद आणि मिहान या वृत्तपत्रांनुसार, तेहरानपासून सुमारे २०० किलोमीटर अंतरावर कॅस्पियन समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या बाबोल आणि बाबोलसर शहरांमध्ये स्फोटांचे आवाज ऐकू आले. या भागांमध्ये हवाई संरक्षण प्रणाली देखील सक्रिय करण्यात आली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही वेळापूर्वीच म्हटले होते की, इस्रायल आणि इराण या दोघांनीही युद्धविरामाच्या अटींचे उल्लंघन केले आहे. ट्रम्प यांनी प्रस्तावित केलेला युद्धविराम मंगळवारी पहाटे सुरू झाला होता, परंतु काही तासांनंतरच इस्रायलने इराणवर क्षेपणास्त्र हल्ल्यांचा आरोप केला. इराणच्या सरकारी माध्यमांनी हे आरोप फेटाळून लावले आणि सांगितले की, त्यांनी इस्रायलवर कोणताही हल्ला केला नाही. दरम्यान, ट्रम्प यांनी दोन्ही पक्षांवर नाराजी व्यक्त करत म्हटले की, 'मी इस्रायलवरही आनंदी नाही.' १२ दिवसांपूर्वी सुरू झालेल्या या युद्धात इस्रायलने इराणच्या अणु आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र ठिकाणांना लक्ष्य केले होते.

## इराण-इस्रायल युद्ध, मायदेशी परतण्यासाठी आसुसलेले भारतीय

**नवी दिल्ली :** इस्रायल इराणमध्ये युद्ध सुरू असल्याने तेथील जनतेला नव्हे तर तेथे काम करणाऱ्या असंख्य भारतीयांनाही समस्यांना सामोरे जावे लागत आहेत. काही भारतीयांना सरकारने मायदेशी परत आणले असले तरी अनेक भारतीय तेथे युद्धाच्या परिस्थितीत अडकले आहेत. उत्तर प्रदेशमधील मेरठमधील सचिन सैनी आणि त्याचे सहकारी हे इराणमध्ये अडकले आहेत. त्याच्या भावाने तेथील परिस्थिती सांगितली आहे. तेथे सतत बॉम्बस्फोटांचे आवाज येत आहेत. डोक्यावरून ड्रोन विमानं उडत आहेत. सचिन आणि त्याच्यासोबत असलेले इतर भारतीय नागरिक खूप घाबरले आहेत. ते आपल्या जीवाची सुरक्षा मागत आहेत. त्यांना भारतात परत यायचे आहे. पण ते ज्या स्टीलच्या कारखान्यात काम करतात, तिथला मालक त्यांना येऊ देत नाहीये.सचिनचा लहान भाऊ मोहित सैनीने याबद्दल माहिती दिली. सचिन ५ फेब्रुवारीला इराणमधील एका स्टील कारखान्यात कामासाठी गेला होता. त्याच्या कुटुंबात पत्नी, सात वर्षांचा मुलगा अर्णव आणि पाच वर्षांची मुलगी अवनी आहे. जवळपास १० दिवसांपूर्वी इराण आणि इस्रायल युद्ध सुरू झाले. त्यामुळे परिस्थिती खूप बिघडली आहे. सचिनने फोनवर त्याच्या कुटुंबाला सांगितले की, तेथे सतत बॉम्बस्फोटांचे आवाज येतात. आकाशात लढाऊ विमानं, ड्रोन फिरत असतात. कारखान्याचा मालक सचिनला जबरदस्तीने रोखून ठेवत आहे. सचिनने भारतात परत येण्यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले आहे.







# परिणाम युद्धाचे!

## इराण-इस्रायल संघर्षामुळे बासमती तांदळाच्या निर्यातीवर परिणाम

**नवी दिल्ली :** इस्रायल-इराण संघर्षाचा भारताच्या तांदूळ निर्यातीवर मोठा परिणाम झाला आहे. बासमती तांदळाच्या दरात मोठी घसरण झाली आहे. भारतातून दरवर्षी निर्यात होणाऱ्या बासमती तांदळापैकी तब्बल २५ टक्के तांदूळ इराणला पाठवला जातो. सध्या सुरू असलेल्या संघर्षामुळे हे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटले आहे.

त्यामुळे तांदूळ उत्पादक शेतकरी व व्यापाऱ्यांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. यामुळे यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शेतकरी व निर्यातदार व्यापाऱ्यांकडून केली जात आहे. गाझियाबादमधील धान्य बाजारात बासमती १५०९ तांदळाच्या दरात केवळ दोन दिवसांत २०० ते ३०० रुपयांची घसरण झाली आहे. काही व्यापाऱ्यांच्या मते ही घसरण ८०० रुपयांपर्यंत पोहोचली आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या तिमाहीत इराणला बासमतीच्या निर्यातीत ३० टक्के घट झाली आहे आणि संघर्ष अधिक वाढल्यास ही घट ५० टक्क्यांपर्यंत पोहचू शकते. यामधून अंदाजे १५,००० कोटी रुपयांचे नुकसान होण्याची भीती वर्तवली जात आहे.

इराण-इस्रायल संघर्षाचा भारताच्या बासमती तांदूळ निर्यातीवर परिणाम झाला आहे. इराण सरकारने स्थानिक उत्पादनाला चालना देण्यासाठी दोन महिन्यांची आयात बंदी जाहीर केली आहे. त्यामुळे भारतातील २५ टक्के तांदूळ हा इराणला निर्यात केला जातो. यामुळे भारतातील तांदूळ उत्पादन शेतकरी व व्यापाऱ्यांना फटका बसत आहे. त्यात विमा कंपन्यांनी युद्धजन्य परिस्थितीमुळे इराणला निर्यातीसाठी विमा देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे मालवाहतुकीचे खर्च वाढले, असे राजेश शाह, बासमती तांदूळ निर्यातदार यांनी सांगितले.



### हे आहेत प्रमुख मुद्दे

- इराणने २१ ऑक्टोबर ते २१ डिसेंबर दरम्यान तांदूळ आयात बंदी घातल्यामुळे निर्यातीत घट.
- भारतातून निर्यात होणाऱ्या एकूण बासमती तांदळापैकी सुमारे २५ टक्के तांदूळ इराणला निर्यात केला जातो, मात्र इस्रायल-इराण संघर्षामुळे गंभीर परिणाम.
- गाझियाबादच्या बाजारात बासमती १५०९ या तांदळाच्या दरात २००-३०० रुपये प्रति क्विंटलने घट, शेतकऱ्यांचा नफा अर्ध्यावर.
- विमा कंपन्यांनी इराणला तांदूळ निर्यातीसाठी विमा देणे बंद केले आहे, त्यामुळे निर्यातीच्या शक्यता आणखी धोक्यात.
- लाल समुद्र मार्ग टाळून केप ऑफ गुड होप मार्ग वापरण्याची शक्यता, परिणामी वाहतूक खर्चात मोठी वाढ.

## इराण-इस्रायल युद्धबंदीमुळे कंपन्यांचे शेअर्स धडाधड कोसळले

**नवी दिल्ली :** गेल्या १२ दिवसांपासून सुरू असलेल्या इराण आणि इस्रायलमधील युद्धाने अवघ्या जगाला चिंतेत टाकले होते. पण आता एक मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे! दोन्ही देशांनी युद्धबंदीवर (खीरप-खीरिशश्र उशरीशषळीश) सहमती दर्शवली आहे आणि युद्ध संपुष्टात आले आहे. या घोषणेचा भारतीय शेअर बाजारावर मोठा आणि तात्काळ सकारात्मक परिणाम दिसून आला, बाजार उघडताच सेन्सेक्स आणि निफ्टी रॉकेट वेगाने धावताना दिसले. मात्र, याचवेळी एक वेगळे चित्रही पाहायला मिळाले. गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वाढणारे संरक्षण (ऊशषशपीश) कंपन्यांचे शेअर्स अचानक कोसळले आणि गुंतवणूकदारांना मोठा धक्का बसला.

### बाजार तेजीत, पण संरक्षण शेअर्स पडले

मंगळवारी शेअर बाजारात सोमवारी झालेली मोठी घसरण थांबली. बीएसई सेन्सेक्स सोमवारी ५११ अंकांनी घसरून बंद झाला होता, पण आज सुरुवातीच्या व्यवहारात तो थेट ९०० अंकांपर्यंत वाढला. तसेच, निफ्टी (छडए छळषीू) मागील दिवशी १४० अंकांनी घसरला होता, तो आज २७० अंकांपेक्षा जास्त वाढीसह व्यवहार करताना दिसला. या तेजीमागील सर्वात मोठे कारण म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेली इराण-इस्रायल युद्धबंदी.

मात्र, ही युद्धबंदीची घोषणा बाजारासाठी सकारात्मक ठरली असली तरी, संरक्षण कंपन्यांच्या शेअर्ससाठी मात्र ती धक्कादायक ठरली. युद्धामुळे गेल्या काही दिवसांपासून ज्या संरक्षण कंपन्यांचे शेअर्स तेजीत होते, ते युद्धबंदीच्या बातमीनंतर उघडताच धडाधड कोसळले.

थोडक्यात, युद्धाचा धोका कमी झाल्याने शेअर बाजारात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. परंतु, युद्धजन्य परिस्थितीमुळे ज्या संरक्षण कंपन्यांना फायदा मिळत होता, त्यांना मात्र युद्धबंदीमुळे तात्पुरता फटका बसला आहे.

### या संरक्षण कंपन्यांचे शेअर्स कोसळले

- **पारस डिफेन्स:** या कंपनीचा शेअर मंगळवारी उघडताच ५ टक्क्यांहून अधिक घसरून १६५२.५० रुपयांवर आला. कंपनीचे बाजार भांडवल (मार्केट कॅप) ६६९० कोटी रुपयांवर आले. गेल्या सहा महिन्यांत हा शेअर ६४.८३% ने वाढला होता.
- **जीआरएसई :** गार्डन रीच शिपबिल्डर्स लिमिटेडचा हा स्टॉक युद्ध संपल्याच्या बातमीनंतर सुमारे ६ टक्क्यांनी घसरून ३२७० रुपयांवर व्यवहार करताना दिसला. कंपनीचे मार्केट कॅप ३७६६० कोटी रुपयांपर्यंत कमी झाले. या शेअरने गेल्या सहा महिन्यांत गुंतवणूकदारांचे पैसे दुप्पट केले होते.
- **झेन टेक :** संरक्षण क्षेत्रासाठी ड्रोन बनवणारी ही कंपनी शेवटच्या ट्रेडिंग दिवसापर्यंत सतत वरच्या सर्किटवर होती. पण युद्धबंदीच्या बातमीचा प्रतिकूल परिणाम होऊन तो २०५७.६० रुपयांवर उघडल्यानंतर अचानक १९१६ रुपयांवर आला. त्याचे मार्केट कॅप १७२८० कोटी रुपयांपर्यंत कमी झाले.
- **माझगाव डॉक :** मंगळवारी या संरक्षण कंपनीचा शेअरही सुमारे ३ टक्क्यांनी घसरून ३२६० रुपयांच्या आसपास व्यवहार करताना दिसला. कंपनीचे बाजारमूल्यही १.३२ लाख कोटी रुपयांपर्यंत घसरले.
- **आयडियाफोर्ज टेक :** हा शेअर ६५४.५० रुपयांवर उघडला, जो त्याच्या मागील बंदपेक्षा कमी होता आणि नंतर अचानक ६०२.६५ रुपयांवर घसरला. कंपनीचे मार्केट कॅप २६५० कोटी रुपयांपर्यंत घसरले.

## इराणच्या हल्ल्यात प्रचंड वित्तहानी, आयरन डोमच्या मर्यादा उघड

**नवी दिल्ली :** इस्राइल आणि इराणदरम्यान गेल्या १२ दिवसांपासून सुरू असलेलं युद्ध अखेर आज थांबलं. १३ जून रोजी इराणमधील अणुकेंद्र उद्ध्वस्त करण्यासाठी इस्राइलने सुरू केलेल्या ऑपरेशन रायझिंग लायनला इराणकडूनही तितकंच विध्वंसक प्रत्युत्तर मिळालं. त्यामुळे इस्राइलमध्ये मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. या युद्धादरम्यान, जगातील एक शक्तिशाली लष्करी ताकद म्हणून मिरवणाऱ्या इस्राइलच्या संरक्षण व्यवस्थेच्या अनेक मर्यादा उघड झाल्या. इराणविरुद्धच्या संघर्षातून इस्राइलला नेमके कोणते धडे मिळाले आहेत. याचा घेतलेला हा आढावा.

इस्राइलच्या दिशेने येणारी क्षेपणास्त्रे आणि इतर हल्ल्यांना रोखण्यासाठी इस्राइलकडून आयरन डोमच्या माध्यमातून रोखली जातात. ही सुरक्षा यंत्रणा छोटी आणि मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे, तसेच ड्रोनना रोखण्यासाठी सक्षम आहे. या युद्धातही इराणने डागलेली ४५० क्षेपणास्त्रे आणि १००० ड्रोनपैकी ९० टक्के हल्ल्यांना आयरन डोमने रोखले. मात्र इराणने डागलेल्या हाज कासेम, खैबर शेकन क्षेपणास्त्रांनी आयरन डोमला हुकलावणी देत लक्ष्यभेद केला, अशी माहिती इन्स्टिट्युट फॉर स्टडी ऑफ वॉरने दिली आहे. आयरन डोमबाबत तज्ज्ञांनी एक्सवर लिहिले की, आयरन डोम जबरदस्त सुरक्षा प्रणाली आहे. मात्र ती एकाच वेळी शेकडो क्षेपणास्त्रांना रोखू शकत नाही. आयरन डोमच्या बॅटरींची संख्या आणि इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांचा पुरवठा मर्यादित असल्याचे या युद्धातून दिसून आले. आता इस्राइलला एरो-२, एरो-३ आणि डेव्हिड्स स्लिंगसारख्या प्रमाली भक्कम कराव्या लागतील. तसेच लेझर आधारित प्रमाणींचा वापर वाढवावा लागेल.

सतत कुठल्या ना कुठल्या शत्रूकडून हल्ल्याची शक्यता नेहमीच असल्याने इस्राइलमध्ये नागरिकांच्या रक्षणासाठी बंकरची व्यवस्था आहे. हल्ल्याच्या शक्यतेचे बिगुल वाजल्यानंतर येथील नागरिक बंकरमध्ये आश्रय घेतात. दरम्यान, इराणने केलेल्या हल्ल्यांमध्ये इस्राइलचे २४ नागरिक मृत्युमुखी पडल्याची तर ६०० हून अधिक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. त्यातील अनेक जण बचावासाठी बंकरकडे पळत असताना हल्ल्यात सापडल्याचे समोर येत आहे. त्यामुळे येत्या काळात इस्राइलला हल्ल्यांपासून रक्षण करण्यासाठी अत्याधुनिक बंकर आणि हल्ल्यांचे संकेत देणारी इशारा प्रणाली उभी करावी लागणार आहे.

इराणबरोबरच्या युद्धात इस्राइलची गुप्तचर यंत्रणा मोसाद आणि लष्करी गुप्तचर विभाग ८२०० ने प्रभावी भूमिका बजावली. अटलांटिक कौन्सिलच्या रिपोर्टनुसार मोसादने इराणमध्ये ड्रोन आणि शस्त्रास्त्रे तैनात केली होती. इस्राइलच्या गुप्तचर यंत्रणांनी अचूक हल्ले करून आयआरजीसीचे २१ कमांडर आणि १० संशोधकांना लक्ष्य केलं. तसेच गुप्तचर यंत्रणांच्या माहितीच्या आधारावर अणुकेंद्रांना लक्ष्य केलं. मात्र इस्राइलला मिळालेल्या गोपनीय माहितीमध्ये काही त्रुटी होत्या. त्यामुळे इराणला त्यांची क्षेपणास्त्रे गोपनीय ठिकाणी हलवता आली. इस्राइलच्या गुप्तचर यंत्रणांना इराणच्या क्षेपणास्त्रांच्या तैनातीवर पूर्ण लक्ष देता आलं नाही. त्यामुळे इस्राइलला भविष्यात सर्वप्रकारच्या गुप्तचर यंत्रणांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा कराव्या लागतील. या हल्ल्यादरम्यान, इस्राइलला जी७ देशांचा पाठिंबा मिळाला. तसेच अमेरिकाही इस्राइलच्या मदतीला आली. जॉर्डन आणि सौदी अरेबियाने आपली हवाई हद्द वापरायला दिली. मात्र तुर्की आणि कतारसारख्या देशांनी इस्राइलच्या कारवाईला विरोध केला. त्यामुळे या कारवाईदरम्यान दोन गट निर्माण झाले. पुढच्या काळात इस्राइलला प्रादेशिक पातळीवर मित्रपक्षांची संख्या वाढवावी लागेल. तसेच संरक्षणासाठी अमेरिकेवर अवलंबून राहणे कमी करावे लागेल, असेही दिसून आले.